# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

वाचाः महाराष्ट्र शासन शासन परीपत्रक, क्रमांकः वेतन-२०२३/प्रक्र१३/सेवा-३, दि. २८.०६.२०२३

## प रि प त्र क

क्र.बीजीए/पेन्शन/०७/२०२३./1236 दिनांकः- ०१ ऑगस्ट, २०२३.

सर्व नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांचे आस्थापनेवर दि. ३० जुन रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लगतच्या ०१ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेवुन सेवानिवृत्ती वेतन निश्चित करण्याबाबत उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

त्युनसार शासननिर्णयातील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे जे कर्मचारी दि. ३० जुन रोजी सेवानिवृत्त झालेले आहे किंवा होत आहेत व ज्यांनी मागील बारा महिन्याची अर्हताकारी सेवा केलेली आहे अशा सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लगतच्या दि. ०१ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेवुन त्यांचे सेवानिवृत्तीवेतन सुधारीत करून संबंधित प्रकरणे कुलसचिव कार्यालयास सादर करावी जेणे करून संबंधितांना सुधारीत लाभ प्रदान करता येईल.

शासन निर्णयात नमुद केलेल्या मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशात नमुद केल्यानुसार सेवानिवृत्तीवेतनधारकांना सदर लाभ प्रदान करण्याकरिता संबंधित कार्यालयाने त्यांचेकडुन विनंती अर्ज प्राप्त करून घ्यावेत. व त्यानंतर सेवानिवृत्तीवेतन धारकांचे मुळसेवापुस्तके कुलसचिव कार्यालयातुन मागवुन सुधारीत प्रकरणाबाबतची उपरोक्त शासननिर्णयाप्रमाणे कार्यवाही करून मुळसेवापुस्तके सुधारीत गणनाज्ञाप, अंतिमवेतनप्रमाणपत्र तसेच त्यांचे विनंती अर्ज व सेवानिवृत्तीवेतनधारकाचे वचनपत्र (सर्व द्विप्रतित) जोडुन सुधारीत प्रकरण या कार्यालयास सादर करण्यात यावे.

सदर परिपत्रक विद्यापीठाचे अर्थ प्रशासन विभाग, यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

मा. कुलगुरू यांचे मंजुरी व आदेशान्वये.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

**प्रतः- माहिती व योग्य कार्यवाहीकरिता रवाना.**

१) नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

२) नियंत्रक अधिकारी,(सर्व)------------------------------------------------------------

३) कार्यालय प्रमुख सर्व ------------------------------------------------------------

४) अधिदान व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर.

५) प्रभारी अधिकारी, संगणक विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

उपकुलसचिव(आस्था)
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.